**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक ०३ मार्च २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पश्चिम आशियातल्या संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी २ विशेष विमानांची सोय/ खास वॉट्सअ‍ॅप मदतक्रमांक जारी.**
2. **रंगोत्सव होळी आणि धूळवड सर्वत्र साजरा.**
3. **वर्षातलं पहिलं खग्रास चंद्रग्रहण सुरु, संध्याकाळी ६ वाजून ४७ मिनिटांनी मोक्ष.**
4. **ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून प्रारंभ, नागपूरच्या मालविका बनसोडचा सामना चीनच्या प्रतिस्पर्धी सोबत.**

व्हॉट्सअ‍ॅप मदत क्रमांक

अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षामुळे संयुक्त अरब अमिरातीमध्ये अडकलेल्या राज्यातल्या १६४ जणांना परत आणण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दोन विमानांची व्यवस्था केली आहे. पश्चिम आशियाच्या संघर्षग्रस्त भागात अडकलेल्या राज्यातल्या नागरिकांसाठी राज्य सरकारने ९७१५ ०३६५ ४३५७ हा आपत्कालीन व्हॉट्सअ‍ॅप मदत क्रमांक जारी केला आहे. दुबईतल्या इंडियन पीपल्स फोरमच्या समन्वयानं राज्य सरकारनं हा क्रमांक जारी केला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः सातत्याने विविध यंत्रणा आणि केंद्र सरकारबरोबर सातत्याने संपर्क ठेवून आहेत. पश्चिम आशियातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर दुबई आणि अबू धाबीहून भारताकडे येणारी विमानसेवा काल रात्रीपासून अंशतः पुन्हा सुरू झाली असून त्यामुळे तिथं अडकलेल्या हजारो भारतीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. दुबई आणि अबू धाबीपासून दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरूकडे काही प्रमाणात विमानसेवा सुरू करण्यात आली. दुबईत अडकलेल्या १४९ प्रवाशांना घेऊन आलेलं एअर इंडियाचं विमान आज सकाळी १० वाजून ५८ मिनिटांनी दिल्ली विमानतळावर उतरलं, तर एमिरेट्स कंपनीचं विमान २१७ प्रवाशांना घेऊन चेन्नई विमानतळावर उतरलं. भारतातल्या विविध विमानतळांवरुन आखाती देशांकडे जाणारी अनेक उड्डाणं नागरी हवाई वाहतूक मंत्रालयानं स्थगित केली आहेत.

प्यारे जिया खान

हज आणि उमराह यात्रेसाठी विदर्भातून तसेच महाराष्ट्रातून सुमारे 45 हजाराच्या वर पर्यटक सौदी अरेबियात सध्या मध्य आशियातील तणावग्रस्त परिस्थितीमुळे 'नो फ्लाय झोन' मुळे अडकून पडले आहे .या पर्यटकांना त्यांच्या राहण्याच्या सोयीसाठी भारतीय दूतावासाशी संपर्क साधायला तर सांगितलंच आहे परंतु यासाठी ट्रॅव्हल्स संचालकांकडून काय मदत होईल याची देखील चाचणी करण्यात येत आहे अशी माहिती राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे जिया खान यांनी दिली आहे.

पश्चिम आशिया तणाव प्रधानमंत्री

पश्चिम आशियात वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री - मोहम्मद बिन सलमान, बहरिनचे राजे हमाद बिन इसा अल खलिफा तसंच जॉर्डनचे राजे अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही मोदी यांनी दूरध्वनीवरून संवाद साधला आणि या भागातल्या घडामोडींबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. या कठीण काळात भारतीय समुदायाची काळजी घेतल्याबद्दल त्यांनी तिन्ही राष्ट्रप्रमुखांचे आभार मानले.

‘शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती’

बळकट अर्थव्यवस्थेमुळे भारत हा जगासाठी आशेचा किरण बनला आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. अर्थसंकल्पानंतरच्या वेबिनारमधे ‘शाश्वत आणि सशक्त आर्थिक प्रगती’ या विषयावर ते दूरस्थ पद्धतीने बोलत होते. आज जग परिवर्तनशील आणि विश्वासार्ह भागीदाराच्या शोधात आहे, त्यामुळे भारताला ही एक मोठी संधी आहे, असं मोदी म्हणाले. भारताने अनेक देशांशी मुक्त व्यापार करार केल्यामुळे संधीची दारं उघडली गेल्याचं प्रधानमंत्री म्हणाले.

***(होल्ड बाईट - पंतप्रधान नरेंद्र मोदी)***

गुणवत्तेबाबत तडजोड न करण्याची जबाबदारी सर्वांची असून देशात तयार होणारी उत्पादनं जागतिक दर्जाची असायला हवीत असं ते म्हणाले. यावेळी प्रधानमंत्र्यांनी उद्योजकांना गुंतवणूक करण्याचं तसंच तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचं आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याचं आवाहन केलं.

## राज्यसभेसाठी उमेदवारांची यादी

भाजपने राज्यसभेसाठी नऊ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. पक्षाने बिहारमधून नितीन नवीन आणि शिवेश कुमार यांच्यासह दोन उमेदवारांची नावे निश्चित केली आहेत. आसाममधून तेराश गोवाला आणि जोगेन मोहन यांना उमेदवारी देण्यात आली आहे. छत्तीसगडमधून लक्ष्मी वर्मा यांना राज्यसभेचे उमेदवार घोषित करण्यात आले आहे. हरियाणामधून संजय भाटिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने ओडिशामधून दोन उमेदवारांची घोषणा केली आहे. यामध्ये प्रदेशाध्यक्ष मनमोहन सामल आणि सुजीत कुमार यांचा समावेश आहे. पश्चिम बंगालमधून राहुल सिन्हा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## धुळवडीचा सण

राज्यात आज सर्वत्र धुळवडीचा सण उत्साहाने साजरा केलाजात आहे. होळीच्या नावाखाली दारू विक्री, अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सर्वत्र पोलीसबंदोबस्त वाढवण्यात आला आहे. नागपुरात ठिकठिकाणी रंग खेळून होळीचा सण साजरा केलाजात आहे. रासायनिक रंगांचा वापर टाळून पर्यावरणपूरक होळी साजरी करूया, असं आवाहन विविध संस्था संघटनांनी केलं आहे. सकाळ पासून लहान मोठे आपापल्या परिसरात रंग उधळताना दिसून आले. वाशीम शहरात रंगपंचमीचा सण महिलांनी व लहान मुलांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. शहराच्या विविध भागांत रंगांची उधळण, हास्य आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी आणि चिमुकल्यांनी नाच-गाण्यासह रंगोत्सवाचा आनंद घेत सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. याशिवाय काल राज्यात विविध ठिकाणी परंपरेनुसार होलिकादहन आणि इतर कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

## सैलानी बाबा यात्रा

सर्वधर्म समभावाचे प्रतीक असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील सैलानी बाबा दर्गा येथे सैलानी बाबा यात्रा महोत्सवाची सुरुवात नारळाच्या होळीने झाली. दरवर्षीप्रमाणे होळीच्या दिवशी दर्ग्यावर चादर अर्पण करून व नारळाच्या होळीची विधिवत पूजा करण्यात आली. नारळाची होळी पेटवल्यानंतर यात्रा महोत्सवाला अधिकृत प्रारंभ झाला असून देश-विदेशातून भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले

आहेत. यात्रेनिमित्त कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून राज्यभरातून एसटीच्या विशेष बससेवाही सुरू करण्यात आल्या आहेत.

खग्रास चंद्रग्रहण/शेगाव

वर्षातलं पहिलं खग्रास चंद्रग्रहण आज होत आहे. दुपारी तीन वाजून २० मिनिटांनी ग्रहण स्पर्श होईल, तर संध्याकाळी ६ वाजून ४७ मिनिटांनी मोक्ष असेल. ग्रहणाचा एकूण कालावधी सुमारे तीन तास २७ मिनिटांचा असेल. ईशान्य भारत आणि अंदमान-निकोबार बेटांतील काही भाग वगळता देशात अनेक ठिकाणी चंद्रोदयाच्या वेळी ग्रहण पाहता येईल. विदर्भातील चंद्रपूरसह राज्यातील सर्व भागांतून नागरिकांना निसर्गाचा हा चमत्कार पाहता येणार आहे. प्रशासनाने आणि खगोल मंडळांनी नागरिकांना या वैज्ञानिक घटनेचा आनंद घेण्याचे आवाहन केले आहे. ही घटना अभ्यासकांसाठी चंद्राच्या छायेचा सखोल अभ्यास करण्याची मोठी संधी ठरणार आहे. ग्रहणाच्या पार्श्वभूमीवर देशातली अनेक मंदिरं बंद राहतील. होळी पौर्णिमेला होणाऱ्या चंद्रग्रहणाच्या पार्श्वभूमीवर राज्यातली अनेक तीर्थस्थळं बंद ठेवण्यात आली आहेत. बुलढाणा जिल्ह्यात काही ठराविक नियमांचं पालन करून शेगाव इथलं संत गजानन महाराजांचं देऊळ सुरू ठेवण्यात आलं आहे.

एटीएस

महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथक एटीएसने राज्यातल्या तीन जिल्ह्यांमध्ये छापे टाकले. आयसीस या दहशतवादी संघटनेशी संबंधित मुंबईत कुर्ला, शिवाजीनगर आणि गोवंडी भागात ही कारवाई करण्यात आली. तर यवतमाळ आणि अहिल्यानगर जिल्ह्यातही छापे टाकण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यात १२ ठिकाणी शोधमोहीम राबवण्यात आली. या कारवाईत ७४ लाख रुपये रोख, तलवारी आणि चाकूसह अन्य धारदार शस्त्रं जप्त करण्यात आली. ही शस्त्र बाळगल्याबद्दल दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याशिवाय अनेक कागदपत्रं, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण आणि सीसीटीव्ही कॅमेरेही जप्त करण्यात आले असून त्यांची तांत्रिक तपासणी केली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यात पुसद आणि उमरखेड भागातल्या १४ संशयितांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आलं आहे.

प्रताप सरनाईक

जाहिरातींच्या माध्यमातून महसूल वाढवण्याचा निर्णय एसटी महामंडळाने घेतला असून पुढच्या पाच वर्षांत अडीचशे कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळवण्याचं लक्ष्य असल्याचं राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले. एसटी महामंडळाच्या मुख्यालयात झालेल्या बैठकीत ते आज बोलत होते. राज्याच्या कानाकोपऱ्यात महामंडळाचे २५१ बस आगार आणि ६१०पेक्षा जास्त बस स्थानकं आहेत. त्यातून दररोज ५० ते ५५ लाख प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे जाहिरातदारांसाठी ही एक सुवर्णसंधी असल्याचं सरनाईक यावेळी म्हणाले.

मालविका बनसोड

ऑल इंग्लंड बॅडमिंटन विजेतेपद स्पर्धेला आजपासून इंग्लंडमधे बर्मिंगहॅम इथं सुरुवात होत आहे.  भारताचा १२ खेळाडूंचा संघ स्पर्धेत उतरला आहे. पुरुष एकेरीत भारताचा अग्रगण्य खेळाडू लक्ष्य सेनचा सामना पहिल्याच फेरीत चीनच्या शी यू ची याच्याशी होणार आहे. महिला एकेरीत नागपूरच्या मालविका बनसोड हिच्यासमोर चीनच्या चेन यूफेई हिचं आव्हान असेल. तर उन्नती हुड्डा हिचा सामना थायलंडच्या पोर्नपावे चोचुवोंग हिच्याशी होणार आहे. पुरुष दुहेरीत भारताची सात्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी ही जोडी उद्या मलेशियाच्या जोडी विरुद्ध खेळेल. अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आखाती हवाई क्षेत्र बंद झाल्यानं ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू, दुबईमध्ये अडकली होती, त्यामुळे ती या स्पर्धेत खेळू शकणार नाही. दरम्यान पी व्ही सिंधू मायदेशी सुखरूप परतली आहे. नुकत्याच हाती आलेल्या बातमीनुसार मालविकाला पराभवाचा सामना करावा लागला आहे.

हवामान

विदर्भातील अकोला जिल्ह्यात आज 38.5 इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली तर अमरावती इथं आज  38.2, वर्धा इथं 38 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आला आहे. कमाल आणि किमान तापमानात सातत्यपूर्ण वाढ नोंदवण्यात येत असून आज नागपुरात देखील 35.8 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं तर 16.4 अंश सेल्सिअस इतकं किमान तापमान होतं. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान 34 अंश सेल्सिअसच्या पुढे असून किमान तापमान 16 अंश सेल्सिअसच्या पुढे आहे.

परीक्षा पुढे ढकलल्या

पश्चिम आशिया प्रदेशातल्या केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या येत्या ५ आणि ६ मार्च रोजी होणाऱ्या इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. परीक्षांच्या नव्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत. येत्या गुरुवारपर्यंत परिस्थितीचा आढावा घेऊन ७ तारखेपासून नियोजित असलेल्या परीक्षांबाबत निर्णय घेण्यात येईल, असंही मंडळाने कळवलं आहे.

*****